# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग
# Maharashtra Electricity Regulatory Commission


निर्णय क्र. मविनिआ/माअअ/अपील/१८/२०१६/**०१२९५** दिनांक- ०५.०१.२०१७

**अपीलामध्ये निदर्शनास आलेले मुद्दे**

| | |
|---|---|
| अपीलकर्ता | श्री जाहीद मुख्तार शेख<br>घर नं. ७८६, दुधबावडी,<br>नारपोली,<br>भिवंडी, जिल्हा ठाणे. |
| माहिती अधिकार अर्ज प्राप्त झाल्याची तारीख | १२.०९.२०१६ |
| जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिल्याची तारीख | १४.०९.२०१६ |
| प्रथम अपील प्राप्त झाल्याचा दिनांक | ०९.१२.२०१६ |

**मागितलेली माहिती**

एम.ए.आर.सी ऑडर नं. १००/२०११, ४२५ अदर क्लेम, भिवंडी, ऑडिट रिव्हीव इम्पॅक्ट मध्ये टोरेन्ट पॉवर फंचायसी, भिवंडी यांनी जी ऑडिट रिपोर्ट दाखल केले आहे. त्या ऑडिट रिपोर्टची नक्कल तसेच आवश्यक कागदपत्रे सहीशिक्क्यासह मिळावे.

**जन माहिती अधिकारी यांचे उत्तर:-**

माहिती अधिकारी यांनी सदरहू अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वेय महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मर्यादित या सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तातरीत केला आहे. सदरहू माहिती त्या सार्वजनिक प्राधिकरणाच्या जनमाहिती अधिकाऱ्याला अर्जदारास परस्पर देण्याची विनंती करण्यात येते अर्जदाराने योग्य ती फि रुपये १०/- या कार्यालयात भरणा केली आहे.

**प्रथम अपील दाखल करण्याचे कारण-**

अपीलार्थी यांनी त्यांच्या अपीलात असे नमूद केले आहे की, माहिती अर्ज दाखल केल्यानंतर आजपर्यत आम्हांस माहीती दिली नाही. किंवा कोणत्याही प्रकारे पत्र दिलेले नाही. माहिती दिली नसल्याने आमचे समाधान झालेले नाही, व माहिती अधिकार कायदयाचे उल्लघन झाले. त्यामुळे मी प्रथम अपील सादर करीत आहे.

**आदेश (माहिती अधिकार अधिनियमाच्या कलम १९ अंतर्गत)-**

संबंधित अर्जावर आयोगाच्या कार्यालयामध्ये दि. २१.१२.२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता सुनावणी ठेवण्यात आली होती. सदर सुनावणीत अपिलार्थी गैरहजर होते. जन माहिती अधिकारी हे हजर होते व त्यांनी आपले निवेदन सादर केले.

माहिती अधिकाराच्या अर्जावरुन प्रथमदर्शनी असे दिसून येते की, अपिलार्थी यांचा माहिती अधिकाराचा अर्ज माहिती अधिकारी यांना दि. १२.०९.२०१६ रोजी प्राप्त झालेला असून त्यावर जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०९.२०१६ रोजी अपिलार्थी यांना असे कळविले आहे कि, सदरहू अर्ज माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ६(३) अन्वेय महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित या

सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तातरीत केला आहे. वरील हस्तातरीत केलेला अर्ज जन माहिती अधिकारी श्री कृष्णा आर नटभजन यांनी पुन्हा कलम ६(३) अन्वेय जनमाहिती अधिकारी, नोडल कार्यालय, भिवंडी मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. एम.एस.बी वसाहत, इमारत टाईप क्र. २, कल्याण रोड, भिवंडी यांना कलम ६(३) अन्वेय हस्तांतरीत केले आहे. अर्जदारास दिनांक ३०.०९.२०१६ च्या कृष्णा आर नटभजन, जनमाहिती अधिकारी (वितरण फ्रचांयसी) पत्राद्वारे अर्जदार श्री जाहीद मुख्तार शेख यांना त्यांच्या अर्जासंबंधाने नोडल कार्यालय भिवंडी मंडळ यांच्याशी संपर्क करावा असे नमुद करण्यात आले होते.

प्रथमदर्शनी या अपिलात असे दिसून येते की माहिती अधिकारी मविनिआ यांनी कलम ६(३) अर्तगंत हस्तातरीत केलेल्या अर्जाला आस्थापना सहाय्यक महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., जनसंपर्क विभाग प्लॉट नं जी - ९ प्रकाशगड वाद्रे, (पूर्व) मुंबई यांनी श्री कृष्णा आर नटभजन यांना हस्तातरीत केला व सदरहू माहिती कालबध्दवेळेत अर्जदारस परस्पर उपलब्ध करुन दयावी असे म्हटले आहे व त्याची प्रत अर्जदारास पाठवून त्या संबधाने त्या कार्यालयाशी संर्पक साधण्यात यावा असे कळविले आहे. तदनंतर, श्री. कृष्णा आर नटभजन, प्रकाशगड वाद्रे, (पूर्व) मुंबई यांनी पुन्हा कलम ६(३) अर्तगत जनमाहिती अधिकारी, नोडल कार्यालय, भिवंडी मंडळ यांना हस्तारीत करुन त्याच्या अर्जासंबंधाने नोडल कार्यालय, भिवंडी मंडळ यांच्याशी संपर्क करावा असे नमुद करण्यात आलेले आहे. परंतु त्यानंतर अर्जदाराला सबब माहिती उपलब्ध करून देण्यात आली किंवा नाही या संबंधाने या कार्यालयाला कळविण्यात आले नाही. तसेच अर्जदार यांनी सदरहू केलेले अपिल यावरून असे निष्पन होते की आपिलार्थी याचा अर्ज वेळोवेळी जनमाहिती अधिकाऱ्यांनी कलम ६(३) अन्वेय सार्वजनिक प्राधिकरणाकडे हस्तातरीत केला असला, तरी अपिलार्थी यांना त्याचा अर्ज संबंधाने राज्य जन माहिती अधिकाऱ्यानी अपिलार्थी याना मुददतीत माहिती उपलब्ध करून दिली नसल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे करीता, राज्य जनमाहिती अधिकारी, नोडल कार्यालय, भिवंडी मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. एम.एस.बी वसाहत, इमारत टाईप क्र. २, कल्याण रोड, भिवंडी, यांनी अपीलार्थीस विनामुल्य ३० दिवसांच्या आत माहिती उपलब्ध करून देण्यात यावी व तसा अहवाल ३० दिवसाच्या आत प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर करावा.

करिता सबब अपील निकाली काढण्यात येत आहे.

**जर प्रथम अपीलीय अधिका-यांच्या उत्तराने आपले समाधान झाले नाही तर आपण राज्य माहिती आयुक्त, १३वा मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मंत्रालयासमोर, मुंबई- ४०० ०३२ येथे अपील दाखल करू शकता.**

**निर्णय**

अपीलार्थी यांना ३० दिवसाच्याआत माहिती विनामुल्य उपलब्ध करून देण्यात यावी.

**(अनिलकुमार उके)**
**उपसंचालक (विधी) तथा**
**प्रथम अपीलीय अधिकारी.**

**प्रत-**

१) जनमाहिती अधिकारी, मविनिआ.

२) जनमाहिती अधिकारी, नोडल कार्यालय, भिवंडी मंडळ, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या. एम.एस.बी वसाहत, इमारत टाईप क्र. २, कल्याण रोड, भिवंडी - ४२१३०२.

३) श्री कृष्णा आर नटभजन, जनमाहिती अधिकारी, तथा उपकार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं. मर्या., वितरण फ्रॅन्चायजी विभाग, ४ था मजला, प्रकाशगड वांद्रे, (पूर्व) मुंबई ४०००५१.